# कार्यकारी संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर यांचे कार्यालय

पहिला माळा, नविन प्रशासकिय इमारत (वन भवन), शासकिय मुद्रणालयाजवळ, झिरो माईल, सिव्हील लाईन, नागपूर - ४४० ००१
दुरध्वनी क्र. ०७१२ - २५६०७२७ Email ID: edpenchfoundation@mahaforest.gov.in
संकेत स्थळ: - www.penchtigerreserve.maharashtra.gov.in सफारी बुकिंग :- www.safaribooking.mahaforest.gov.in

**क्रमांक**:- पेटाकंफा/प्रक्र.163/277/25-26 नागपूर,440001, दिनांक 20/10/2025

**विषय**:- पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर महाराष्ट्र पदभरती (कंत्राटी पध्दतीवर) जाहिरात दिलेल्या पदांची शैक्षणिक व अतिरिक्त पात्रता संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत

उपरोक्त विषयाकिंत प्रकरणी पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर पदभरती (कंत्राटी पध्दतीवर) बाबत जाहिरात ही स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रकाशित करण्यात करीता पाठविण्यात आलेली आहे.

या अनुषंगाने पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर पदभरती (कंत्राटी पध्दतीवर) जाहिरात दिलेल्या पदांची शैक्षणिक व अतिरिक्त पात्रता प्रकाशित करण्याकरिता या सोबत पाठविण्यात येत आहे. तरी सदरहु माहिती त्वरीत http://www.mahaforest.gov.in and www.penchtigerreserve.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर (Upload) प्रकाशित करण्यात यावी.

**सहपत्र** :- वरीलप्रमाणे.

**(श्रीलक्ष्मी ए)**
कार्यकारी संचालक
पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर

**प्रति,**

श्री. योगेश काळे, NIC Programmer,
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(वन्यजीव) पुर्व, नागपूर

# कार्यकारी संचालक
# पेंच व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान,नागपूर, महाराष्ट्र

## पदभरती (कंत्राटी पध्दतीवर)

कार्यकारी संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर कार्यालया अंतर्गत 11 महिन्याच्या कंत्राटी तत्वावर Veterinary Officer (पशुवैद्यकीय अधिकारी), समुदाय समन्वयक (Community Coordinator) असे एकूण 2 पदाची नेमणुक करावयाची आहे. http://www.mahaforest.gov.in/ www.penchtigerreserve.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून तसेच पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान नागपूर या कार्यालयाच्या नोटीस बोर्ड वरून प्राप्त करता येईल. या कार्यालयात प्रत्यक्ष सादर केलेल्या व ई-मेलव्दारे प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाईल,याची कृपया नोंद घ्यावी. प्रत्यक्ष / ई-मेलव्दारे अर्ज दिनांक 31/10/2025 रोजी संध्याकाळी 5.00 वाजेपर्यंत स्विकारण्यात येईल. त्यानंतर प्राप्त झालेला अर्जाचा विचार केला जाणार नाही.

प्राथमिक छाननीनंतर पात्र उमेदवारांना (Shortlist Candidates) मुलाखतीची तारीख, वेळ व स्थळ दूरध्वनी/ई-मेलव्दारे कळविण्यात येईल. तसेच मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांची यादी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर/संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

अर्ज करण्याकरीता खालील ई-मेलचा वापर करावा.

edpenchfoundation@mahaforest.gov.in

**(श्रीलक्ष्मी ए)**
कार्यकारी संचालक
पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर

# जाहिरात दिलेल्या पदांची शैक्षणीक व अतिरिक्त पात्रता

| अ. क्र. | पदाचे नाव | एकुण पद | मानधन | मुख्यालय | आवश्यक शैक्षणीक पात्रता | अतिरिक्त पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | Veterinary Officer (पशुवैद्यकीय अधिकारी) | 01 | 60,000/- | मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक पेंच व्याघ्र प्रकल्प,नागपूर यांचे कार्यालय अंतर्गत | स्नातकोत्तरमध्ये मान्यताप्राप्त विद्यापीठातून 60% गुणांसह पदव्युत्तर पदवी. वन्यजीव विषयासह पदव्युत्तर पदवी (एम.व्ही.एस.सी) ला प्राधान्य देण्यात येईल. | वन्यजीव, उपचार व हाताळण्याचा अनुभव. पशुवैद्यकीय शास्त्राच्या क्षेत्रातील किमान 3 वर्षांचा व्यावहारिक अनुभव. |
| 2 | समुदाय समन्वयक (Community Coordinator) | 01 | 30,000/- | मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक पेंच व्याघ्र प्रकल्प,नागपूर यांचे कार्यालय अंतर्गत | मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी/ पदवीत्तर B.Sc / M.Sc/ MSW असणे. मराठी, इंग्रजी हिंदी बोलता व वाचता लिहिण्यास सक्षम असावे. | 1.वनविभागात काम केलेले असल्याचा किमान 1 वर्षाचा अनुभव.<br>2.ग्राम पुनर्वसन, पुनर्वसन कार्य किंवा समुदाय सहभाग कार्यातील अनुभव, विशेषत: वनक्षेत्र किंवा वन्यजीव संवर्धन क्षेत्रात अनुभव.<br>3. स्थानिक समुदास, प्रशासन आणि क्षेत्रीय कर्मचाऱ्यांशी समन्वय साधण्यासाठी उत्तम संवाद कौशल्य.<br>4. स्थानिक भाषेचे ज्ञान व ग्रामीन/वनाधारित समाजरचनेबद्दलची समज असणे फायदेशीर ठरेल.<br>5. व्याघ्र प्रकल्पाचा क्षेत्रात कार्य करण्याची तयारी असावी. |

टिप:-

1) या पदाकरीता मराठी व इंग्रजीचे पुरेसे ज्ञान (वाचता,लिहीणे, बोलणे) अत्यावश्यक आहे.
2) निवड झालेल्या उमेदवारास वरील तक्त्यात दर्शविलेल्या मुख्यालय ठिकाणी काम करावे लागेल.
3) पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर पदभरती (कंत्राटी पध्दतीवर) सदर पदाकरीता बायोडाटा (Resume) व अर्ज (Application) तसेच वरील प्रमाणे दर्शविलेल्या शैक्षणिक व अतिरिक्त पात्रता बाबतचे मुळ दस्ताऐवज मुलाखतीच्या वेळेस दाखविण्यात यावे.
4) उमेदवार हा कोणत्याही इतर शासकीय, निमशासकीय, अशासकीय संस्था किंवा संघटना यांचा पदाधिकारी असता कामा नये.
5) सदर पदे ही पुर्णवेळ असल्याने या काळात उमेदवाराला इतरत्र काम/प्रॅक्टीस करता येणार नाही.
6) नियुक्ती झालेल्या कंत्राटी पदास 24 तास सेवेकरीता तत्पर राहणे बंधनकारक राहील. मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांचे आदेशान्वये पेंच व्याघ्र प्रकल्प कार्यक्षेत्रात कोणत्याही ठिकाणी कार्य करावे लागेल.
7) नियुक्त प्राधिकारी समितीने घेतलेला निर्णय अंतिम राहिल यांची कृपया उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(श्रीलक्ष्मी.ए)
कार्यकारी संचालक,
पेंच व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, नागपुर